संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# अरे...सांत्वनाचे सौजन्य तरी पाळा

**देशाच्या** एकजूटीचे बळ कितीतरी प्रचंड असू शकते. हे अभूतपूर्वरीतीने दिसून आले आहे. सव्वाशे कोटीपेक्षा जास्त लोकसंख्येचा हा देश अनेक राज्य, अनेक भाषा , धर्म,पंथ, भेद, अशा कितीतरी गोष्टींनी त्यामध्ये वैविध्य आहे. परंतु ज्यावेळी देश म्हणून एकत्र उभे राहाण्याची वेळ येते त्या त्या वेळी भारतातील अतिशय सामान्य माणसापासून असामान्य व्यक्तींपर्यंत सगळेजण एकदिलाने एकत्र येतात. भारतीयत्व आणि देशाविषयी वाटणारा हा अभिमान अत्यंत महत्वाचा ठरतो. सैनिक प्राणपणाने लढतात. जीवाची बाजी लावतात. शत्रूचा संधी मिळताच निप्पातही करतात. पण अशी काही एकवेळ येते की शत्रूदेखील आपला डाव साधतो. जवानांना आपल्या प्राणांची आहुती द्यावी लागते. पुलवामा हल्ल्याचा प्रकार हा असाच शत्रूने साधलेला डाव ठरतो. या हल्ल्यात बळी पडलेले ४३ जवान आणि या नुकसानीची झळ जवळपास प्रत्येक भारतीयाला पोचल्याचे ठिकठिकाणच्या निदर्शनांवरून ठिकठिकाणी उत्स्फूर्तपणे व्यक्त झालेल्या प्रतिक्रियांमधून किंवा त्या हुतात्म्यांना वाहिल्या गेलेल्या श्रध्दांजलीच्या कार्यक्रमांमधून स्पष्टपणाने दिसून येते. आज सगळा देश अस्वस्थ आहे. सरकार काय निर्णय देईल, लष्कर कोणती कारवाई करेल हा सगळाच धोरणात्मक भाग ठरतो. ज्याप्रमाणे शत्रूने या जवानांना खिंडीत गाठून त्यांचे प्राण घेतले त्याचप्रमाणे भारतालाही व्यूहरचना करावी लागेल. यापुढे देशाचे नुकसान नाहीच. तर शत्रूची सर्वबाजूंनी दाणादाण उडवण्याची तयारी केली पाहिजे. या सर्व हुतात्म्यांना सगळ्या माध्यमांतून श्रध्दांजली वाहिली गेली त्यांच्याबद्दल आदर सन्मान व्यक्त झाला. दक्षिण भारतातल्या एका अंत्ययात्रेत तर शेकडो मीटर लांबीचा राष्ट्रध्वजच लोकांनी डोक्यावर घेतला होता. तर दुसरीकडे मुंबईसारख्या भागात एका हातगाडीवाल्याने स्वतःच्या कष्टाचा सर्व भाग हुतात्म्यांसाठी देऊ केला त्याचठिकाणी सुरु झालेली ही मदतीची मोहीम आणि एका संस्थेने घेतलेला पुढाकार यामध्येकेवळ दहा मिनीटात सतरा लाखाचा निधी संकलित होऊ शकला.

## त्या जवानांच्या कुटुंबियांवरचे आघात

यावेळची विशेष उल्लेख करण्यासारखी गोष्ट अशी की जे बॉलिवूड किंवा उद्योगक्षेत्र फार उशिराने जागे होते तेही यावेळेला मदतीसाठी पुढे सरसावले आहे. अमिताभ बच्चनने प्रत्येक हुतात्म्यांच्या कुटुंबियांना देऊ केलेली पाच लाख रुपयांची मदत रिलायन्स उद्योगाने हुतात्म्यांच्या कुटुंबियांचा शिक्षण आणि नोकरीचा उचलेलला भार एवढेच नव्हे तर त्यांच्या वैद्यकीय उपचाराचीव्यवस्था हा समूह करू इच्छितो. अक्षय कुमार या अभिनेत्याने देशातील प्रत्येकाला एक एक रुपया जवानांसाठी देण्याचे आवाहन केले आहे. अशी हजारो उदाहरणे देशभरात पाहायला मिळाली त्यामधून देशाच्या सामान्य माणसाने राष्ट्रीयत्वाची एकजूट दाखवून दिली. या पार्श्वभूमीवर एक बाब विशेषत्वाने जाणवली ती म्हणजे एकाचवेळी इतक्या मोठ्या सैनिकांचे बलिदान गेले असताना ज्या पध्दतीने सरकारी पातळीवर राष्ट्रीय दुखवटा पाळला जाणे गरजेचे होते. ते भान सरकारला राहिलेले दिसत नाही. कोणताही मोठा गेल्यानंतर तीन दिवसापासून ते दहा दिवसापर्यंतचे राष्ट्रीय दुखवटे पाळले जातात. राष्ट्रध्वज अर्ध्यावर उतरवले जातात. त्या राजकारण्यांचे किंवा नेत्यांचे देशासाठी असे कोणतेही मोठे योगदान नसताना हे दुखवटे सरकारकडून घोषित होतात. परंतु ज्यावेळी चाळीसपेक्षा जास्त जवान हुतात्मा होतात त्यावेळी सरकारने हे भान ठेवायला हवे होते आणि एक दिवसाचा राष्ट्रीय दुखवटा पाळून त्यांच्याविषयी सन्मान दाखवायला हवा होता. ही वेळ दुखवट्याची नाही. तर देशाच्या एकजूटीची आहे. यातही काही शंका नाही परंतु चाळीस जवानांच्या घरामध्ये किंवा त्यांच्या कुटुंबियांमध्ये दुःखाचा जो प्रचंड आवेग पाहायला मिळाला आणि देशाच्या चाळीस जवानांचे प्राण जेव्हा जातात तेव्हा त्याविषयी वाटणारी हळहळ शब्दामधून व्यक्त होऊ शकत नाही. लोकांच्या भावनांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या सरकारने यासाठी पुढाकार घ्यायचा असतो. यापूर्वी फ्रान्समध्ये अशा प्रकारे एकाचवेळी वीस जवानांचे बळी गेले असताना या सरकारने राष्ट्रीय दुखवटा पाळून राष्ट्रध्वज अर्ध्यावर आणले होते. त्यातून समाजात या जवानांच्या बलिदानाचा नकळत सन्मान केला गेला. सरकारला आणि समाजालासुध्दा हे भान राहाण्याकरीता या गोष्टींची गरज वाटू लागते. जी गोष्ट याच राष्ट्रीय एकजूटीला फार मोठे बळ देणारी ठरू शकते. केवळ तिरंग्या ध्वजामध्ये लपेटलेले त्यांचे देह त्यांच्या घरी पोहचवले म्हणजे त्यांचा सन्मान झाला असे होत नाही. देशभर एकाचवेळी एकाच पध्दतीने त्यांच्याविषयी दाखवली गेलेली भावना अन्य जवानांच्या धैर्याला प्रोत्साहन देणारी तर कुटुंबियांच्या सांत्वनाला साहाय्यभूत ठरणारी होऊ शकते.

## पुढचे पंधरा दिवस समारंभ नकोत

या हल्ल्याचा बदला घेणे हा तर त्या जवानांच्या बलिदानाचा मोठाच सन्मान ठरेल यात काही शंका नाही. परंतु एकीकडे सगळा समाज ,देश सर्व प्रकारचे भेद विसरून आपली राष्ट्रीय भावना व्यक्त करतो. त्यावेळी या हल्ल्याविषयीच्या त्यांच्या भावना किती तीव्र आहेत हे स्पष्ट होते. महत्वाची गोष्ट अशी होती की अशा प्रकारचा हल्ला स्वतंत्र भारताच्या इतिहासात पहिल्यांदाच झाला. त्याची पुनरावृत्ती होऊ द्यायची नसेल तर देशवासियांनीदाखवलेल्या या अभेद्य एकजूटीची देखील तितकीच मोठी दखल सरकारला घ्यावी लागेल. आणि म्हणूनच या जवानांच्या बलिदानाचा अधिक योग्य सन्मान झाला पाहिजे. जर या घटनेनंतर सरकारच्या किंवा देशातील इतर अनेक संघटनांच्या किंवा राजकीय पक्षांच्या कार्यक्रमांमध्ये कोणताच बदल होत नसेल तर त्यांना सांत्वनाचे सौजन्यही समजलेले नाही असे म्हणण्याची वेळ येते. मोदींनी हल्ल्याच्या दुसऱ्याच दिवशी वेगवेगळ्या योजनाच्या उदघाटनांचे जे कार्यक्रम केले ते शोभनीय नव्हते. ते पुढे ढकलता आले असते. एकीकडे जवानांच्या पार्थिवाला अग्नी दिला जात असताना दुसरीकडे उदघाटनांचे झेंडे फडकवले जात असतील तरसरकारच आपल्या कर्तव्यात आणि जबाबदारीत कसूर दाखवत आहे असे म्हणावे लागते. निदान पुढच्या दहा पंधरा दिवसात कोणतीही उदघाटने आणि संमेलने टाळली गेली पाहिजेत. मग ते महाराष्ट्रातले नाट्यसंमेलन असोत किंवा देशपातळीवरील राजकीय पक्षांची अधिवेशने असोत. ती रद्द झाली पाहिजेत. एक दिवस राष्ट्रीय दुखवटा पाळणे तर दूरच राहिले पण सांत्वनाचे सौजन्यही कसोशीने पाळले जाऊ नये हे आणखीनच दुर्दैवी ठरते.